# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

## समाजशास्त्र विभाग

## Notice

दिनांक - २५ / १० /२०२४

समाजशास्त्र विभागातील B.A.III च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या सत्रातील अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे सेमिनार दि.३०/१०/२०२४ पर्यंत जमा करावे.

प्रा. एच. व्ही. चामे

विभाग प्रमुख

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Subject Wise Student Blank Marks Entry

**Session:** OCTOBER-NOVEMBER 2024

**Subject:** SOCIOLOGY- IX (DSE - 1021E3)

**Stream:** B.A.

**Standard:** B.A. - TY

**Sub-Subject:** CIE

**Semester:** SEM - V

**Max Marks:** 15

| SrNo | PRN | SeatNo | GRNos | StudentName | Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2022014010 | 48233 | 3002700 | BEDKALE SAMIKSHA SUDARSHAN | 15 |
| 2 | 2022014029 | 48244 | 3003059 | CHOUGALE SHIVLILA PANDURANG | 15 |
| 3 | 2022014040 | 48251 | 3002193 | DESAI RUHANA SARDAR | 15 |
| 4 | 2022014044 | 48252 | 3004193 | DHANGAR PRITI SUNIL | 14 |
| 5 | 2022014295 | 48294 | 3006617 | KHANDEKAR VAISHNAVI UTTAM | 13 |
| 6 | 2022014149 | 48305 | 3002523 | LOKHANDE SWITI PRASHANT | 13 |
| 7 | 2022014157 | 48311 | 3002302 | MANE ANUJA YUVRAJ | 13 |
| 8 | 2021014674 | 48312 | 2950435 | KEDAR SHANKAR MANE | 14 |
| 9 | 2022014176 | 48325 | 3002331 | NASVALE SANA FARUK | 14 |
| 10 | 2022014188 | 48330 | 3002189 | PATHAN SANIYA AAYUBKHAN | 13 |
| 11 | 2021014784 | 48341 | 2953338 | Punekar Hujaf Shakil | 13 |
| 12 | 2022014227 | 48346 | 3002327 | SATHE SAKSHI DILIP | 14 |
| 13 | | 48350 | 3014776 | SHELAR SONALI TANAJI | 13 |
| 14 | 2022014234 | 48351 | 3002197 | SHINDE KARISHMA VILAS | 15 |
| 15 | 2022014249 | 48357 | 3002184 | TODKAR VAISHNAVI SAMBHAJI | 15 |
| 16 | 2022014252 | 48358 | 3002334 | ULAPE BHUMI RANJIT | 15 |
| 17 | 2022014257 | 48360 | 2953953 | WAGAVEKAR RUTUJA JITENDRA | 14 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR * (Empowered Autonomous) * ESTD JUNE 1964

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

14/15

42701

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor:

Name :- Rutuja Jitendra Wagavekar

Suppliment No. :

Subject : समाजशास्त्र

Roll No. : 4960

Test / Tutorial No. : पेपर नं - 9.

Class : BA. TY

Div. : sem - 5

प्र: 1] ग्रामीन समाजशास्त्राचे स्वरुप.

ग्रामीन समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय व व्याप्ती अभ्यासल्यानंतर ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप आपण समजावून घेणार आहोत. ग्रामीण समाजशास्त्राच्या स्वरुपाचे यथार्थ आकलन होण्यासाठी पुढील मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

1] ग्रामीण समाजशास्त्र हे एक विज्ञान (शास्त्र) आहे. कारण, ग्रामीण समाजाचा ते वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करते. वैज्ञानिक पद्धती ही अभ्यासाची एक विशेष पद्धती आहे. या पद्धतीने एखादया विषयाचा अभ्यास करताना सर्वप्रथम त्या विषयाशी संबंधित असलेल्या घटनांची निरीक्षण व इतर साधनांच्याद्वारे माहिती गोळा केली जाते. यालाच तथ्य संकलन (data collection) असे म्हणतात. नंतर त्या माहितीचे संकलन, विश्लेषण व वर्गीकरण केले जाते. त्यानंतर त्या माहितीच्या आधारे घटना घटनामधील परस्परसंबंधाविषयी अंदाज वा तर्क म्हणजे अभ्युपगम (hypothesis) केला जातो. पुढे त्या अभ्युपगमाची प्रचिती (Verification) घेऊन त्याची सिद्धता (Proof) केली जाते. त्यानंतर सिद्ध झालेल्या अभ्युपगमाचे सामान्यीकरण (generalization) करून त्याला सामान्य

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

नियमाचे रूप दिले जाते. आणि शेवटी त्या नियमाचा अगोदरच्या नियमांशी समन्वय साधला जातो. 3

2) ग्रामीण समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठीत (Empirical) विज्ञान आहे. अनुभवनिरपेक्ष शास्त्रे (Non-empirical sciences) आणि अनुभवाधिष्ठीत शास्त्रे (empirical sciences) असे एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. ज्या शास्त्रातील नियम (ज्ञान) केवळ बौद्धिक चिंतनातून स्फुरलेले असतात व त्यांचे प्रामाण्यही (सत्यता) बुद्धीच्याद्वारे तपासले जाते, त्यासाठी अनुभवाची गरज नसते, त्यांना अनुभव निरपेक्ष शास्त्र असे म्हणतात. उदा. गणित आणि तर्कशास्त्र, याउलट ज्या शास्त्रातील नियमांची उभारणी अनुभवाच्या आधारे केली जाते व त्यांचे प्रामाण्यही अनुभवाद्वारेच तपासले जाते. त्यांना अनुभवाधिष्ठीत शास्त्रे म्हणतात. उदा. पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी. हैड्रोजन व ऑक्सिजनच्या संयोगातून पाणी तयार होते हा रसायनशास्त्रातील नियम किंवा हरितद्रव्य बनण्यासाठी वनस्पतींना सूर्यप्रकाशाची गरज असते. हा वनस्पतीशास्त्रातील नियम केवळ बौद्धिक चिंतनाद्वारे कधीच समजला नसता. त्यासाठी प्रत्यक्ष अनुभवाची गरज असते. म्हणून ही शास्त्रे अनुभवाधिष्ठीत ठरतात. ग्रामीण समाजशास्त्र देखील असेच एक अनुभवाधिष्ठीत शास्त्र आहे. कारण त्यातील नियमांची उभारणीही ग्रामीण समाजातील घटनांच्या अनुभवांच्या आधारे होते. ग्रामीण समाजशास्त्र केवळ बौद्धिक चिंतन न करता ग्रामीण सामाजिक घटनांचे वस्तुनिष्ठ करून त्या आधारे ग्रामीण विकासाचे सामान्य नियम शोधून काढते व त्यांचे प्रामाण्यही अनुभवाच्या आधारेच तपासून पाहते. म्हणून ते अनुभवाधिष्ठीत शास्त्र ठरते. 4

3] ग्रामीण समाजशास्त्र हे तथ्यात्मक किंवा वस्तुनिष्ठ (positive) विज्ञान आहे.

तथ्यात्मक (Positive) शास्त्रे व आदर्शात्मक (Normative) शास्त्रे असेही एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. जी शास्त्रे आपल्या विषयांचा अभ्यास आदर्शांच्या किंवा मूल्यांच्या (ideals or norms) संदर्भात करतात त्यांना आदर्शात्मक शास्त्रे म्हणतात. उदा. तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र इत्यादी. याउलट जी शास्त्रे आपल्या विषयाचा अभ्यास तथ्यांच्या किंवा वस्तुस्थितीच्या (facts) संदर्भात करतात त्यांना तथ्यात्मक शास्त्रे म्हणतात. उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी. आदर्शात्मक शास्त्रे "काय असावे" (What ought to be) या प्रश्नाचा तर तथ्यात्मक शास्त्रे "काय आहे" (What is) या प्रश्नाचा अभ्यास करतात. नीतिशास्त्र मानवाचे वर्तन आदर्श स्वरूपात कसे असावे या दृष्टिकोनातून मानवी वर्तनाचा अभ्यास करते म्हणून ते आदर्शात्मक शास्त्र ठरते. याउलट ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण लोकांचे सामाजिक वर्तन प्रत्यक्षात कसे आहे या दृष्टिकोनातून वर्तनाचा अभ्यास करते.

4] ग्रामीण समाजशास्त्राकडे पूर्वकथन क्षमता (Power of Prediction) आहे.

कोणत्याही शास्त्रातील नियम हे समान परिस्थितीत सर्वत्र खरेच ठरतात. त्यामुळे त्या नियमांच्या आधारे अचूक पूर्वकथन करता येते. जी स्थिती आता उपलब्ध नाही तिच्याविषयी काहीतरी निवेदन करणे म्हणजे पूर्वकथन होय. या अर्थाने पूर्वकथन हे भविष्यकाळाप्रमाणेच भूतकाळाविषयीचेही असू शकते. उदा. खगोलशास्त्रातील नियमांच्या आधारे भविष्यात कोठे व केव्हा सूर्यग्रहण होईल हे अचूकपणे सांगता येते. पुरातत्वशास्त्रातील नियमांच्या आधारे उत्खननात सापडलेल्या नाण्यांचा

... COLLEGE K...APUR ESTD 1964 Empowered Autonomous

Scanned with OKEN Scanner

किंवा प्राण्यांच्या सांगाड्यांचा कालावधी सांगता येतो. ग्रामीण समाजशास्त्रातील नियमांच्या आधारेही असे पूर्वकथन करता येते.

5] ग्रामीण समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे. ग्रामीण समाजशास्त्राचा उदय अलिकडील काळातील असल्याने ते एक नवीन विज्ञान आहे. तथापि त्याचा अल्पावधीत खूपच विकास झालेला आहे. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्र हे एक स्वतंत्र विज्ञान आहे असा काहींचा समज होऊ शकतो. परंतु येथे हे लक्षात घेतले पाहिजे की ग्रामीण समाजशास्त्रास स्वतंत्र विज्ञान न मानता त्यास ग्रामीण समाजशास्त्राचीच एक शाखा मानणे अधिक तर्कसंगत ठरते. ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र देखील असेच मानतात. यासंदर्भात प्रा. टायलर म्हणतात की " ग्रामीण समाज हा अखिल मानव समाजाचाच एक अविभाज्य भाग आहे, हे लक्षात घेऊनच ग्रामीण समाजाचा अभ्यास केला पाहिजे. त्यामुळे मानव समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र हे समाजशास्त्र ठरते. आणि ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारे ग्रामीण समाजशास्त्र हे समाजशास्त्राची एक शाखा ठरते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

15/15

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

42542

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

नाव : रुहाना सरदार देसाई

| | |
|---|---|
| Suppliment No. : | Signature of Supervisor |
| Roll No. : 4946 | Subject : समाजशास्त्र |
| Class : BA : TY | Test / Tutorial No. : sem - 5 |
| | Div. पेपर नंबर - 9 |

• ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासविषय -

१) ग्रामीण समुदायाचा अभ्यास : ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समुदायाचा म्हणजेच खेड्यांचा सर्वांगीण व सहेतुकशीर अभ्यास करते. त्या दृष्टीने ग्रामीण समुदायाचा अर्थ, वैशिष्ट्ये, ग्रामीण समुदायात होणारे बदल, ग्रामीण समुदायाची रचना, ग्रामीण समुदायाचे म्हणजे खेड्याचे विविध प्रकार इ. अभ्यास या शास्त्रात होतो.

२) ग्रामीण सामाजिक जीवनाचा अभ्यास : ग्रामीण समाजशास्त्रात ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक इ. सर्व अंगांचा किंवा पैलूंचा सविस्तर अभ्यास केला जातो. साडरसन म्हणतात त्याप्रमाणे या शास्त्रात ग्रामीण लोकसंख्या रचना, ग्रामीण लोकांचे जीवनमान, व्यवसाय, आर्थिक स्थिती अभ्यास केला जातो.

ESTD JUNE 1964

३) ग्रामीण सामाजिक संघटनांचा अभ्यास : बर्ट्रांड म्हणतात की ग्रामीण समाजशास्त्रात ग्रामीण सामाजिक संघटनांचा म्हणजेच ग्रामीण भागातील सामाजिक संस्था, समूह, सामाजिक स्तरीकरण व्यवस्था

इ. चा अभ्यास होतो.

4) ग्रामीण सामाजिक प्रक्रियेचा अभ्यास : ग्रामीण समाजात व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह, समूह-समूह यांच्यात घडणाऱ्या सामाजिक प्रक्रियांचा अभ्यासही या भागात केला जातो. त्यादृष्टीने ग्रामीण समाजातील सहकार्य, स्पर्धा, संघर्ष इत्यादी प्रक्रियांचा अभ्यास हे शास्त्र करते.

5) ग्रामीण आर्थिक जीवनाचा अभ्यास : शेती हा ग्रामीण समाजाचा प्रमुख व्यवसाय आहे. तेथील इतर व्यवसायही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेतीवरच अवलंबून आहेत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीप्रधान आहे. त्यामुळे ग्रामीण समाजात जमिनीला खूप महत्त्व आहे. ग्रामीण समाजजीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी ग्रामीण आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

6) ग्रामीण धर्माचा अभ्यास : बहुसंख्य ग्रामीण लोक अडाणी, निरक्षर, अंधश्रद्ध, देवभोळे व रूढीप्रिय आहेत. त्यामुळे त्यांच्यावर धर्माचा पगडा पडला आहे. धार्मिक विधी व कर्मकांड ते मोठ्या श्रद्धेने पार पाडतात. ग्रामीण लोकांची जीवनपद्धती व वर्तन हे धर्माद्वारे नियंत्रित होते. त्यामुळे ग्रामीण समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यांच्या अंधश्रद्धा, धर्माचरण, कर्मकांड, धार्मिक उत्सव, इ. ग्रामीण धर्म व इतर सामाजिक संस्था यांच्यातील परस्परसंबंध इत्यादी गोष्टींचा अभ्यास या भागात केला जातो.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 Empowered Autonomous

7) ग्रामीण व नागर समाजातील भिन्नतेचा अभ्यास : अखिल मानव समाजाचे

ग्रामीण व नागर समाज असे दोन प्रकार पडतात. या दोन्ही समाजात परिसर, आकारमान, लोकसंख्येची घनता, व्यवसाय, स्तरीकरण व्यवस्था, सामाजिक आंतरक्रियांचे स्वरुप, सामाजिक गतिशीलता इत्यादीबाबतीत भिन्नता आहे. ही भिन्नता असल्याशिवाय ग्रामीण समाजाचे यथार्थ स्वरुप समजणार नाही.

8) <u>ग्रामीण सामाजिक समस्यांचा अभ्यास</u> : ग्रामीण समाजात विविध सामाजिक समस्या असून त्यांची तीव्रता सतत वाढत चालली आहे. त्यामुळे ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना त्या समाजातील अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, अनारोग्य, लोकसंख्यावाढ, अनिश्चितता, अंधश्रद्धाळूपणा, मनोरंजन व शिक्षण सुविधांचा अभाव, नैतिक व धार्मिक मूल्यांचा होणारा ऱ्हास इ. समस्यांची कारणे, परिणाम व त्यांच्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास केला जातो.

9) <u>ग्रामीण पुनर्रचनेचा अभ्यास</u> : आधुनिक काळात औद्योगिकीकरण, नागरिकरण, दळणवळणाची प्रगत साधने, शिक्षणप्रसार इत्यादींच्या प्रभावा पडून ग्रामीण समाजाचे विघटन सुरु झाले. त्यामुळे ग्रामीण समाजात अनेक समस्या निर्माण होऊन ग्रामीण लोकांचे जीवन अत्यंत कष्टदायक बनले. त्यामुळे या समस्यांची सोडवणूक करून ग्रामीण समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक योजना, प्रकल्प व कार्यक्रम सुरु करण्यात आले. यालाच ग्रामीण पुनर्रचना असे म्हणतात.

१०) <u>ग्रामीण सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास</u> : अलिकडील काळात औद्योगिकीकरण, नागरिकरण, लोकशाहीकरण, निधर्मीकरण दळणवळणाची प्रगत साधने, शैक्षणिक व नागरी सुविधांचा प्रसार

COLLEGE KOLHAPUR ESTD. JUNE 1964 (Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

ग्रामीण पुनर्रचनेचे कार्यक्रम इत्यादी घटकांचा प्रभाव पडून ग्रामीण समाजात परिवर्तन होऊ लागले आहे. त्यामुळे या परिवर्तनाच्या अभ्यासाला ग्रामीण समाजशास्त्राला करणे भाग पडत आहे. या दृष्टीने ग्रामीण परिवर्तनाचे स्वरूप, त्याची कारणे, त्या परिवर्तनाच्या मार्गातील अडथळे, त्या परिवर्तनाची दिशा व गती इ. बाबींचा वस्तुनिष्ठ अभ्यास या शास्त्रात होतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Empowered Autonomous)